प्रेसनोट

दि.२/०५/२०२५

लोकसेविका श्वेता लक्ष्मण नाईक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग विरार व खाजगी इसम तनेश पाटील यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने कारवाई केल्या बाबत.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :— | विरार पोलीस स्टेशन, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र.३३/१७.५० वा. दि.२.५..२०२५ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | १) लोकसेविका श्वेता लक्ष्मण नाईक वय ५४ वर्षे दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग विरार (वर्ग—३) रा.रुम नं.१०४ ब कोकण रेसीडेन्सी कारवार मराठा संघ सीटीएस ८५९ डहाणूकर वाडी जवळ लालजी पाडा कांदीवली पश्चिम मुंबई ६७.<br>२) तनेष अजित पाटील, वय २३ वर्षे,खाजगी इसम रा.मु.पो.तांदुळवाडी ता.जि.पालघर. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ११,०००/— रु.तडजोडी अंती १०,०००/—रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | १०,०००/— रु. त्यात ५००/—रुपये दराच्या २० भारतीय चलनाच्या नोटा |
| थोडक्यात हकीगत | :— | तक्रारदार यांचे ड्रिंक अॅन्ड डिम या नावाचे बिअर शॉप असून सदरचे बिअर शॉप चालविण्याकरीता लोकसेविका दुय्यम निरीक्षक श्वेता नाईक राज्य उत्पादन शुल्क विरार यांनी तक्रारदार यांचेकडे दरमहा २०००/—रुपये असे एकूण ५ महिन्याचे १०,०००/—रु. व नोकरनामा फार्मवर सही करण्याकरीता १०००/—रु. असे एकूण ११,०००/—रु. लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना लोकसेविका दुय्यम निरीक्षक श्वेता नाईक राज्य उत्पादन शुल्क विरार यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/०४/२०२५ रोजी लोकसेविका दुय्यम निरीक्ष क श्वेता नाईक राज्य उत्पादन शुल्क विरार हे ११,०००/—रू. लाचेची मागणी करीत असले बाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>त्याप्रमाणे दिनांक ३०/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेविका श्वेता नाईक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विरार यांनी तक्रारदार यांचेकडे ११०००/—रु. लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. आज दिनांक २.५.२०२५ रोजी लोकसेविका श्वेता लक्ष्मण नाईक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विरार यांनी खाजगी इसम तनिष अजित पाटील यांना लाचेची रक्कम स्विकारण्यास सांगितल्या वरुन खाजगी इसम तनिष पाटील यांनी १०,०००/—रु. लाचेची रक्कम स्विकारताच रंगेहात पकडण्यात आले आहे. व लोकसेविका श्वेता नाईक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विरार यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>त्याबाबत विरार पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र.३३ वेळ १७.५० वा. दि. २.५.२०२५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे.सदर बाबत पुढील कारवाई सुरु आहे |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.शिवराज पाटील, सो,पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.सुहास शिंदे सो.अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

**मा.श्री.संजय गोविलकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :— 1064
६) दुरध्वनीक्रमांक :—022—20813599/20813599

(प्रगती अडसुरे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.